Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843
दैनिक जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स
मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे
।शुक्रवार, दि. १२ जून २०२६। वर्ष १ ।अंक ६७ ।पाने २।
DIGITAL EDITION



वीजबिलांवरून शिरपूर फर्स्टचा महावितरण कार्यालयावर ठिय्या

(पान २ वर)

Selected

## पिंपरखेड मारुती मंदिर चोरी प्रकरणाचा उलगडा

पारोळा : शहरापासून सुमारे दोन किलोमीटर अंतरावर असलेल्या पिंपरखेड मारुती मंदिरातून चांदीचा मुकुट आणि कानातील चांदीच्या मासोळ्या चोरी झाल्याप्रकरणी पारोळा पोलिसांनी अवघ्या काही दिवसांत गुन्ह्याचा छडा लावत संशयित आरोपीला अटक केली आहे. आरोपीकडून चोरीस गेलेला सुमारे ६५ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून त्याला न्यायालयात हजर करण्यात येणार आहे. करणाचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक योगेश महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू करण्यात आला. तपास पथकातील पोलीस हवालदार कैलास साळुंखे, संदीप सातपुते तसेच पोलीस कर्मचारी अजय बाविस्कर, आकाश माळी, सुनिल पाटील, अभिजित पाटील, गिरिश सोनवणे आणि अनिल राठोड यांनी मंदिर परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची बारकाईने पडताळणी केली.

## महाजनांचा टोला; नाशिक-जळगावमधील महायुतीची बंडखोरी संपल्याचा दावा

# ‘विरोधी पक्षांचे देशात अन् राज्यात वाजले की हो बारा!

## काळे यांच्या माघारीची औपचारिकता बाकी, ‘सक्षम विरोधी पक्ष उरलेलाच नाही’ अशी टीका

जन सम्राट टाईम्स

**जळगाव : राज्यातील विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुतीतील बंडखोरी जवळपास संपुष्टात आल्याचा दावा करत मंत्री गिरीश महाजन यांनी विरोधकांवर जोरदार हल्लाबोल केला. “देशात आणि राज्यात विरोधी पक्षांचे अक्षरशः बारा वाजले आहेत. सक्षम विरोधी पक्ष उरलाच नाही,” असा टोला त्यांनी लगावला.**

प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना महाजन म्हणाले की, “देशात एकेकाळी तृणमूल काँग्रेस (टीएमसी) हा प्रभावी पक्ष मानला जात होता. मात्र आता त्यांचीदेखील स्थिती बदलली आहे. विरोधी पक्षांनी एकत्र येऊनही पाहिले आणि स्वतंत्रपणे लढूनही पाहिले, पण त्यांना यश मिळालेले नाही.” राज्यातील १७ विधान परिषद जागांसाठी निवडणूक प्रक्रिया सुरू असून सहा जागांवर महायुतीचे उमेदवार बिनविरोध निवडून येण्याची शक्यता आहे. उर्वरित ११ जागांसाठी १८ जून रोजी मतदान होणार आहे. नाशिकमध्ये भाजपचे बंडखोर उमेदवार प्रसाद हिरे यांची नाराजी दूर करण्यात यश आल्याचा



उल्लेख करत महाजन म्हणाले की, अपक्ष उमेदवार गोकुळ गिते यांनी माघार घेतल्यामुळे शिवसेनेचे उमेदवार नरेंद्र दराडे यांचा मार्ग मोकळा झाला आहे. त्याचप्रमाणे जळगाव विधान परिषद निवडणुकीतील बंडखोरीचाही प्रश्न मार्गी लागल्याचा दावा त्यांनी केला. भाजपने नंदकिशोर महाजन यांना उमेदवारी दिल्यानंतर शिवसेना शिंदे गटाच्या रेश्मा काळे यांनी अपक्ष उमेदवारी दाखल केली होती.

मात्र, त्यांच्या माघारीची केवळ औपचारिक घोषणा बाकी असून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे स्वतः याबाबत घोषणा करतील, असे महाजन यांनी सांगितले. शरद पवार गट काँग्रेसमध्ये विलीन होणार असल्याच्या चर्चांवर प्रतिक्रिया देताना गिरीश महाजन म्हणाले, “त्यांना माझ्या शुभेच्छा आहेत. राहुल गांधी आणि शरद पवार यांची जोडी एकत्र येऊन चांगले काम करेल. राज्यात एक सक्षम विरोधी पक्ष शिल्लक राहायला हवा, पण सध्या तशी परिस्थिती दिसत नाही.प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना महाजन म्हणाले की, “देशात एकेकाळी तृणमूल काँग्रेस (टीएमसी) हा प्रभावी पक्ष मानला

### इंडिया आघाडीवरही निशाणा

इंडिया आघाडीतील नेतृत्वाच्या प्रश्नावर भाष्य करताना महाजन म्हणाले, “उद्धव ठाकरे यांनी नुकताच पंतप्रधानपदाचा चेहरा कोण, असा प्रश्न उपस्थित केला आणि त्यानंतर आघाडीतच मतभेद उफाळून आले. आजही त्यांच्याकडे पंतप्रधानपदासाठी एकमताचा चेहरा नाही. जर त्यांनी कोणाचे नाव जाहीर केले, तर पुन्हा त्यांच्यात मतभेद निर्माण होतील.” राज्यातील विधान परिषद निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर गिरीश महाजन यांनी केलेल्या या विधानांमुळे राजकीय वातावरण आणखी तापण्याची चिन्हे असून, विरोधी पक्षांकडून त्याला काय प्रत्युत्तर दिले जाते याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

जात होता. मात्र आता त्यांचीदेखील स्थिती बदलली आहे. विरोधी पक्षांनी एकत्र येऊनही पाहिले आणि स्वतंत्रपणे लढूनही पाहिले, पण त्यांना यश मिळालेले नाही.” राज्यातील १७ विधान परिषद जागांसाठी निवडणूक प्रक्रिया सुरू असून सहा जागांवर महायुतीचे उमेदवार बिनविरोध निवडून येण्याची शक्यता आहे.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

## एसटी कर्मचाऱ्यांना ५८ टक्के महागाई भत्ता

### प्रताप सरनाईक यांची मोठी घोषणा

जन सम्राट टाईम्स



**मुंबई || प्रतिनिधी:** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (एसटी) कर्मचाऱ्यांसाठी राज्य सरकारने मोठा दिलासा देणारा निर्णय जाहीर केला आहे. राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी एसटी कर्मचाऱ्यांना राज्य सरकारी कर्मचाऱ्यांप्रमाणेच ५८ टक्के महागाई भत्ता (डीए) देण्याची घोषणा केली. याशिवाय कर्मचाऱ्यांची सुमारे १०० कोटी रुपयांची थकबाकीही अदा करण्याचा निर्णय घेण्यात आल्याची माहिती त्यांनी पत्रकार परिषदेत दिली. प्रताप सरनाईक म्हणाले की, एसटी ही ग्रामीण महाराष्ट्राची जीवनवाहिनी असून लाखो प्रवाशांना सेवा देणाऱ्या कर्मचाऱ्यांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यामुळे त्यांना न्याय मिळावा आणि त्यांच्या प्रलंबित मागण्यांची पूर्तता व्हावी, यासाठी सरकारने हा निर्णय घेतला आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची सकारात्मक भूमिका महागाई भत्ता वाढविणे आणि थकबाकी अदा करण्याबाबत आपण एकनाथ शिंदे यांच्याशी चर्चा केली असून त्यांनी या प्रस्तावाला सकारात्मक प्रतिसाद दिल्याचे सरनाईक यांनी सांगितले. तसेच एसटी महामंडळावरील आर्थिक बोजा कमी करण्यासाठी वित्त विभागाने सहकार्य करावे, यासाठी मुख्यमंत्री यांच्याकडे निवेदन सादर करण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. उत्पन्नवाढीसाठी विशेष आराखडा एसटी महामंडळाची आर्थिक स्थिती अधिक सक्षम करण्यासाठी उत्पन्न वाढीवर भर देण्यात येत असल्याचे सरनाईक यांनी सांगितले.

### ९०० बसेस महामंडळाच्या ताफ्यात दाखल होतील

नवीन बसेसचा ताफा दिवाळीपर्यंत पूर्ण परिवहन मंत्री सरनाईक यांनी सांगितले की, पहिल्या टप्प्यात २,६४० नवीन एसटी बसेस उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. दुसऱ्या टप्प्यातील ३ हजार बसेसपैकी १५० बसेसचे वितरण पूर्ण झाले असून लवकरच आणखी ८०० ते ९०० बसेस महामंडळाच्या ताफ्यात दाखल होतील.

## महिलेवर अत्याचार करून जीवे मारण्याची धमकी; पारोळ्यात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल

### पेट्रोल पंपाजवळ बोलावून शेतात नेल्याचा आरोप; न्यायालयाकडून चार दिवसांची पोलीस कोठडी

जन सम्राट टाईम्स

**पारोळा | प्रतिनिधी:** पारोळा-अमळनेर मार्गावरील एका पेट्रोल पंपाजवळ २८ वर्षीय महिलेवर जबरदस्तीने लैंगिक अत्याचार करून तिला व तिच्या मुलीला जीवे मारण्याची धमकी दिल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी पीडित महिलेच्या फिर्यादीवरून पारोळा पोलीस ठाण्यात संशयित आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून न्यायालयाने त्याला चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, पीडित महिला अमळनेर रोड परिसरात आपल्या मुलीसह वास्तव्यास आहे. मंगळवारी रात्री सुमारे ८ वाजण्याच्या सुमारास संशयित कृष्णा आनंदा घिसाडी याने तिला अमळनेर




रोडवरील एच.पी. पेट्रोल पंपाजवळ भेटण्यासाठी बोलावल्याचा आरोप आहे तक्रारीनुसार, घटनेनंतर आरोपीने पीडितेला पोलिसांकडे तक्रार न करण्यासाठी धमकावत, “या प्रकाराची माहिती दिल्यास आत्महत्या करून चिठ्ठीत तुझे नाव लिहीन आणि तुला खोट्या गुन्ह्यात अडकवीन,” असे सांगितले. तसेच पीडिता आणि तिच्या अल्पवयीन मुलीला गंभीर परिणाम भोगावे लागतील, अशा स्वरूपाच्या धमक्याही दिल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. घटनेनंतर घाबरलेल्या पीडितेने १० जून रोजी रात्री साडेअकराच्या सुमारास पारोळा पोलीस ठाणे गाठून तक्रार दाखल केली. तिच्या फिर्यादीवरून संशयित कृष्णा घिसाडी याच्याविरुद्ध संबंधित कलमान्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. दरम्यान, आरोपीला गुरुवारी न्यायालयात हजर करण्यात आले असता न्यायालयाने त्याला चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली.

## पिंपरी-चिंचवड भाजपमध्ये निष्ठावंत कार्यकर्त्यांची नाराजी

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस वरवींद्र चव्हाण यांच्याकडे ई-मेलद्वारे तक्रार

जन सम्राट टाईम्स

**पिंपरी । प्रतिनिधी:** : पिंपरी-चिंचवड शहर भारतीय जनता पक्षाच्या शहर कार्यकारिणीत जुन्या व निष्ठावंत कार्यकर्त्यांना स्थान दिले जात नसल्याचा गंभीर आरोप भाजप कार्यकर्ते सचिन काळभोर यांनी केला आहे. यासंदर्भात त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्याकडे ई-मेलद्वारे तक्रार दाखल करून पक्षासाठी दीर्घकाळ काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना न्याय देण्याची मागणी केली आहे. काळभोर यांनी दिलेल्या माहितीनुसार, १३ मे २०२५ रोजी शत्रुघ्न काटे यांची पिंपरी-चिंचवड भाजप शहराध्यक्षपदी नियुक्ती झाल्यानंतर शहर कार्यकारिणीच्या रचनेत जुन्या कार्यकर्त्यांकडे सातत्याने दुर्लक्ष करण्यात येत आहे. गेल्या एक वर्ष २९ दिवसांपासून अनेक निष्ठावंत कार्यकर्त्यांना शहर कार्यकारिणीत स्थान देण्यात आले नसल्याचा दावा त्यांनी केला आहे. त्यांच्या आरोपानुसार, नागरी समस्या सोडवण्यासाठी मोर्चे, आंदोलने आणि विविध लोकहिताच्या प्रश्नांवर सातत्याने काम करणाऱ्या जुन्या कार्यकर्त्यांना डावलून नव्याने पक्षात प्रवेश केलेल्या काही कार्यकर्त्यांना तसेच माजी नगरसेवकांना महत्त्वाची पदे देण्यात आली आहेत. ‘आमदार समर्थकांनाच प्राधान्य’ असल्याचा आरोप सचिन काळभोर यांनी असा आरोप केला आहे की, शहर कार्यकारिणीच्या नियुक्त्यांमध्ये केवळ काही आमदार




समर्थक कार्यकर्त्यांनाच प्राधान्य दिले जात असून निष्ठावंत व जुन्या कार्यकर्त्यांना जाणीवपूर्वक दूर ठेवले जात आहे. तसेच, नियुक्ती प्रक्रियेत काही लोकप्रतिनिधी दबावतंत्राचा वापर करत असल्याचा दावाही त्यांनी केला आहे. त्यामुळे शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांच्यावर स्वतंत्रपणे निर्णय घेण्याऐवजी दबावाखाली काम करावे लागत असल्याची भावना अनेक कार्यकर्त्यांमध्ये निर्माण झाली असून त्यामुळे त्यांच्या भावना दुखावल्या गेल्याचा आरोप काळभोर यांनी केला आहे. मुख्यमंत्री व प्रदेशाध्यक्षांनी हस्तक्षेप करण्याची मागणी या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी या प्रकरणाची तातडीने दखल घेऊन पिंपरी-चिंचवड शहर भाजप कार्यकारिणीत जुन्या कार्यकर्त्यांना योग्य प्रतिनिधित्व मिळेल, यासाठी हस्तक्षेप करावा, अशी मागणी सचिन काळभोर यांनी केली आहे. दरम्यान, शहर कार्यकारिणीच्या नियुक्त्यांबाबत करण्यात आलेल्या या आरोपांवर संबंधित पक्षपदाधिकारी किंवा अन्य संबंधितांकडून अद्याप अधिकृत प्रतिक्रिया समोर आलेली नाही.

## महाजन यांच्या विधानामुळे सैनिकांचा 'अपमान'!

### अभय पटवर्धन यांची तीव्र प्रतिक्रिया

जन सम्राट टाईम्स

**मुंबई | प्रतिनिधी :** भाजपचे ज्येष्ठ नेते तथा मंत्री गिरीश महाजन यांनी ऑपरेशन ब्लू स्टारच्या ४२ व्या स्मृतिदिनानिमित्त अमृतसर येथे केलेल्या वक्तव्यावरून नवा वाद निर्माण झाला आहे. कार्यक्रमात ऑपरेशन ब्लू स्टारचा उल्लेख ‘काळा दिवस’ असा करताना भारतीय सैन्याविरोधात लढलेल्या विभाजनवादी व्यक्तींचा उल्लेख ‘शहीद’ असा केल्याचा आरोप होत असून, या पार्श्वभूमीवर निवृत्त कर्नल अभय पटवर्धन यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. ‘हे केवळ वादग्रस्त नव्हे, तर दुर्दैवी विधान’ गिरीश महाजन यांच्या वक्तव्यावर प्रतिक्रिया देताना कर्नल अभय पटवर्धन म्हणाले, “हे केवळ वादग्रस्त विधान नाही, तर अत्यंत दुर्दैवी विधान आहे. महाराष्ट्राचे मंत्री म्हणून गिरीश महाजन यांना त्या काळातील परिस्थितीची माहिती असायला हवी होती. जर्नैलसिंग भिंद्रनवाले खलिस्तानची घोषणा करण्याच्या तयारीत होते. त्यासाठी स्वतंत्र चलन, पासपोर्ट, पत्रके आणि लेटरहेडसुद्धा तयार करण्यात आले होते.” ‘पाकिस्तानच्या कटाला हाणून पाडण्यासाठी कारवाई’ पटवर्धन यांच्या म्हणण्यानुसार, त्या काळात पाकिस्तानचा मोठा डाव होता. “भिंद्रनवाले सुवर्ण मंदिरातून खलिस्तानची घोषणा करतील आणि त्याच वेळी पाकिस्तान अमृतसरवर हल्ला करून शहर ताब्यात घेईल. पठाणकोटवरही हल्ल्याचा कट होता. या योजनेची माहिती भारत सरकारला मिळाल्यानंतरच ऑपरेशन ब्लू स्टार राबविण्यात आले,” असे त्यांनी सांगितले. ‘देशविरोधी कारवाया करणाऱ्यांवर कारवाई हे सरकारचे कर्तव्य’ या कारवाईत भिंद्रनवाले आणि माजी लष्करी अधिकारी शाबेग सिंग



यांचा मृत्यू झाला होता. याबाबत बोलताना पटवर्धन म्हणाले, “शाबेग सिंग आमच्यासोबत ब्रिगेडियर म्हणून कार्यरत होते. मात्र नंतर त्यांनी भिंद्रनवाले यांची साथ दिली. एखादी व्यक्ती कितीही चांगली असली तरी ती देशाविरोधात उभी राहत असेल, तर तिच्यावर कारवाई करणे हे सरकारचे कर्तव्य असते आणि तेच त्या वेळी करण्यात आले.” ‘महाजनांच्या वक्तव्यामुळे सैनिकांचा अपमान’ पुढे ते म्हणाले, “आम्हीही सुवर्ण मंदिर परिसरात कारवाईसाठी गेलो होतो. आमच्याकडे मर्यादित साधनसामग्री होती. आजही काहीजण भिंद्रनवाले यांचा स्मृतिदिन शहीद दिन म्हणून साजरा करतात. अशा वेळी गिरीश महाजन तेथे का गेले, हे मला माहीत नाही.

### विरोधकांकडूनही भूमिकेवर टीका

निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राजकीय हेतू असू शकतो. मात्र त्यांनी केलेल्या विधानामुळे आमच्या सैनिकांचा अपमान झाला असून मी त्या वक्तव्याचा तीव्र निषेध करतो.” गिरीश महाजन यांच्या वक्तव्यानंतर राज्यातील राजकीय वातावरण तापले असून विरोधकांकडूनही त्यांच्या भूमिकेवर टीका केली जात आहे. दरम्यान, या प्रकरणावर महाजन यांची अधिकृत भूमिका काय असेल, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

## कुंभार समाजासाठी मोठी खुशखबर! मुख्यमंत्र्यांचा महत्त्वपूर्ण आदेश

### 700 ब्रास मातीवरील रॉयल्टी माफ, नव्या सवलतींचा वर्षाव

जन सम्राट टाईम्स

**मुंबई | प्रतिनिधी :** राज्यातील पारंपरिक कुंभार समाजाच्या आर्थिक आणि व्यावसायिक उन्नतीसाठी राज्य सरकारने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनंतर महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी कुंभार समाजासाठी विविध सवलती जाहीर केल्या आहेत. राज्यातील पारंपरिक कुंभार समाजाला मोठा दिलासा देणारा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. आता पिढीजात कुंभार कुटुंबांना वर्षाला ७०० ब्रासपर्यंत माती उत्खननासाठी कोणतेही स्वामित्वधन अर्थात रॉयल्टी भरावी लागणार नाही. यासोबतच ओळखपत्र, एक




खिडकी योजना आणि क्लस्टर विकासासारख्या अनेक सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. महसूल विभागाने जारी केलेल्या तरतुदीनुसार, पिढीजात कुंभार कुटुंबांना विटा, कौले तसेच इतर मातीच्या वस्तू तयार करण्यासाठी तलाव, खाडी, नदी, नाला किंवा शासकीय पडीक जमिनीतून वर्षाला ७०० ब्रासपर्यंत माती रॉयल्टीशिवाय उपलब्ध होणार आहे. ‘पिढीजात कुंभार कुटुंब’ या व्याख्येत पती, पत्नी आणि १८ वर्षांखालील अपत्यांचा समावेश असेल. या योजनेचा लाभ कुटुंबातील एका व्यक्तीस दिला जाणार आहे. याशिवाय गावतळी, पाझर तलाव, बंधारे किंवा पाणलोट क्षेत्रातील गाळ व माती कुंभार कुटुंबाने स्वखर्चाने काढल्यास त्यावरही ७०० ब्रासपर्यंत रॉयल्टी आकारली जाणार नाही. मात्र यासाठी संबंधित विभागाची ना-हरकत आणि विहित शुल्कांचा भरणा आवश्यक राहणार आहे. महाखनिज संगणक प्रणालीवर ऑनलाईन अर्जाची सुविधा तहसीलदार कार्यालयामार्फत डिजिटल स्वाक्षरीयुक्त ओळखपत्र ओळखपत्राची वैधता पाच वर्षे एक खिडकी योजना कुंभार व्यवसायासाठी विशेष क्लस्टर विकास पारंपरिक कुंभार खाणींवरील अतिक्रमणे हटविण्यास प्राधान्य औष्णिक विद्युत केंद्रांमधून फ्लाय अ‍ॅश प्रति टन १०० रुपयांदराने उपलब्ध जीवनमान उंचावण्यास मदत कच्च्या मालाची कमतरता आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा अभाव यामुळे कुंभार व्यवसाय अनेक अडचणींना सामोरा जात होता. या पार्श्वभूमीवर सरकारने घेतलेल्या निर्णयामुळे कुंभार बांधवांना व्यवसाय वाढविण्यास मदत होणार असून त्यांच्या जीवनमानातही सुधारणा होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### ७०० ब्रासपर्यंत रॉयल्टी आकारली जाणार नाही

राज्यातील पारंपरिक कुंभार समाजाला मोठा दिलासा देणारा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. आता पिढीजात कुंभार कुटुंबांना वर्षाला ७०० ब्रासपर्यंत माती उत्खननासाठी कोणतेही स्वामित्वधन अर्थात रॉयल्टी भरावी लागणार नाही. यासोबतच ओळखपत्र, एक खिडकी योजना आणि क्लस्टर विकासासारख्या अनेक सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. महसूल विभागाने जारी केलेल्या तरतुदीनुसार, पिढीजात कुंभार कुटुंबांना विटा, कौले तसेच इतर मातीच्या वस्तू तयार करण्यासाठी तलाव, खाडी, नदी, नाला किंवा शासकीय पडीक जमिनीतून वर्षाला ७०० ब्रासपर्यंत माती रॉयल्टीशिवाय उपलब्ध होणार आहे. ‘पिढीजात कुंभार कुटुंब’ या व्याख्येत पती, पत्नी आणि १८ वर्षांखालील अपत्यांचा समावेश असेल. या योजनेचा लाभ कुटुंबातील एका व्यक्तीस दिला जाणार आहे. याशिवाय गावतळी, पाझर तलाव, बंधारे किंवा पाणलोट क्षेत्रातील गाळ व माती कुंभार कुटुंबाने स्वखर्चाने काढल्यास त्यावरही ७०० ब्रासपर्यंत रॉयल्टी आकारली जाणार नाही.

# जातीय द्वेषातून घर पाडल्याचा आरोप; महिलेची पालकमंत्र्यांकडे न्यायाची हाक

## कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्याची मागणी

जन सम्राट टाईम्स



**धुळे। प्रतिनिधी:** धुळे शहरातील देवपूर परिसरातील जगन्नाथ नगर येथील रहिवासी मंडाबाई रघुनाथ भाले यांनी आपले घर राजकीय दबाव आणि जातीय द्वेषातून पाडण्यात आल्याचा गंभीर आरोप करत धुळे जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे न्यायाची मागणी केली आहे. संबंधित प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर अनुसूचित जाती-जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्याची मागणी त्यांनी केली आहे. मंडाबाई भाले यांनी आपल्या निवेदनात नगरसेवकांसह काही व्यक्तींवर संगनमताने राजकीय प्रभावाचा वापर करून महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांशी हातमिळवणी केल्याचा आरोप केला आहे. तसेच, व्हॉट्सअॅप समूहावर स्वतःविषयी आणि आपल्या मुलाविषयी अपमानास्पद व जातीय द्वेषातून प्रेरित संदेश प्रसारित करण्यात आल्याचाही दावा त्यांनी केला आहे.

तक्रारीनुसार, संबंधित व्यक्तींकडून वारंवार जातीवाचक शब्दांत अपमान करण्यात आला असून, "येथून निघून जा, तुमचा महारवाडा तिकडे आहे," अशा प्रकारची वक्तव्ये सार्वजनिक ठिकाणी करण्यात येत होती. आपण हिंदू महार समाजातील असल्यामुळेच भेदभावपूर्ण वागणूक देण्यात आल्याचा आरोपही त्यांनी निवेदनात केला आहे.

मंडाबाई भाले यांच्या म्हणण्यानुसार, त्यांचे कुटुंब गेल्या सुमारे ७० वर्षांपासून संबंधित ठिकाणी वास्तव्यास आहे. मात्र, वैयक्तिक आणि राजकीय आकसातून त्यांच्या विरोधात महानगरपालिकेकडे तक्रारी करण्यात आल्या आणि कोणतेही पुनर्वसन न करता जेसीबीच्या साहाय्याने घर पाडण्यात आले. या कारवाईदरम्यान घरातील साहित्य, महत्त्वाची कागदपत्रे तसेच बकरीपालन व्यवसायाशी संबंधित वस्तूंचे मोठे नुकसान झाल्याचा दावाही त्यांनी केला आहे. पावसाळ्याच्या कालावधीत रहिवासी घरे पाडू नयेत, अशा शासनाच्या निर्देशांकडे दुर्लक्ष करून ही कारवाई करण्यात आल्याचा आरोपही त्यांनी निवेदनात केला आहे.

या घटनेमुळे आपण व आपले कुटुंब बेघर झाले असून आर्थिक संकटात सापडल्याचे त्यांनी म्हटले आहे. पालकमंत्र्यांना दिलेल्या निवेदनात मंडाबाई भाले यांनी संपूर्ण प्रकरणाची स्वतंत्र आयोगामार्फत चौकशी, जातीय भेदभावाची तपासणी, संबंधित प्रशासनाकडून अहवाल मागविणे, योग्य पुनर्वसन व नुकसानभरपाई तसेच दोषी आढळणाऱ्या व्यक्तींविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली आहे. याशिवाय, कुटुंबाच्या सुरक्षिततेसाठी पोलीस संरक्षण देण्याची आणि संबंधित आरोपींविरुद्ध अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्याची मागणीही त्यांनी केली आहे. दरम्यान, या प्रकरणातील आरोप हे मंडाबाई भाले यांनी आपल्या निवेदनात केलेले असून, संबंधित व्यक्ती किंवा प्रशासनाची अधिकृत बाजू अद्याप समोर आलेली नाही.

### जेसीबीच्या साहाय्याने पाडण्यात आले घर

संबंधित प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर अनुसूचित जाती-जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्याची मागणी त्यांनी केली आहे. मंडाबाई भाले यांनी आपल्या निवेदनात नगरसेवकांसह काही व्यक्तींवर संगनमताने राजकीय प्रभावाचा वापर करून महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांशी हातमिळवणी केल्याचा आरोप केला आहे. तसेच, व्हॉट्सअॅप समूहावर स्वतःविषयी आणि आपल्या मुलाविषयी अपमानास्पद व जातीय द्वेषातून प्रेरित संदेश प्रसारित करण्यात आल्याचाही दावा त्यांनी केला आहे.

तक्रारीनुसार, संबंधित व्यक्तींकडून वारंवार जातीवाचक शब्दांत अपमान करण्यात आला असून, "येथून निघून जा, तुमचा महारवाडा तिकडे आहे," अशा प्रकारची वक्तव्ये सार्वजनिक ठिकाणी करण्यात येत होती. आपण हिंदू महार समाजातील असल्यामुळेच भेदभावपूर्ण वागणूक देण्यात आल्याचा आरोपही त्यांनी निवेदनात केला आहे. मंडाबाई भाले यांच्या म्हणण्यानुसार, त्यांचे कुटुंब गेल्या सुमारे ७० वर्षांपासून संबंधित ठिकाणी वास्तव्यास आहे. मात्र, वैयक्तिक आणि राजकीय आकसातून त्यांच्या विरोधात महानगरपालिकेकडे तक्रारी करण्यात आल्या आणि कोणतेही पुनर्वसन न करता जेसीबीच्या साहाय्याने घर पाडण्यात आले.

# इंग्लिश मीडियम शाळांतील समस्यांवर युवासेना आक्रमक!

## एकनाथ आंबेकर यांची भेट घेऊन निवेदन

जन सम्राट टाईम्स



**धुळे । प्रतिनिधी** : धुळे जिल्ह्यातील शासकीय वस्तीगृह आणि इंग्लिश मीडियम शाळांमधील विविध समस्यांबाबत युवासेनेने आक्रमक भूमिका घेत शिक्षण उपसंचालक एकनाथ आंबेकर यांची भेट घेऊन सविस्तर निवेदन सादर केले. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेपासून ते मूलभूत सुविधांपर्यंत अनेक गंभीर प्रश्न उपस्थित करत तातडीने सुधारणा करण्याची मागणी करण्यात आली. युवासेनेचे जिल्हाध्यक्ष योगेश राजेंद्र मराठे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने मांडलेल्या निवेदनात शासकीय वस्तीगृहातील अनेक त्रुटींवर प्रकाश टाकण्यात आला. मेसमधील काही कर्मचारी दारूच्या नशेत काम करत असल्याचा आरोप करण्यात आला असून, विद्यार्थ्यांना निकृष्ट दर्जाचे जेवण दिले जात असल्याची तक्रारही करण्यात आली. याशिवाय वस्तीगृहात कायमस्वरूपी वॉचमन नसणे, अनेक सीसीटीव्ही कॅमेरे बंद अवस्थेत असणे, संडास व स्नानगृहांची दुरवस्था, तसेच स्वच्छ पिण्याच्या पाण्याचा अभाव असल्यामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्य आणि सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. वस्तीगृहाचा कारभार नियमित कर्मचाऱ्यांऐवजी तात्पुरत्या कर्मचाऱ्यांवर अवलंबून असल्याने रात्री-अपरात्री विद्यार्थ्यांना कोणतीही अडचण उद्भवल्यास जबाबदारी कोणाची, असा सवालही युवासेनेने उपस्थित केला आहे. विद्यार्थ्यांच्या हितासाठी वस्तीगृहात निवासी अधिकाऱ्याची तातडीने नियुक्ती करावी, अशी प्रमुख मागणी करण्यात आली. दुसरीकडे, इंग्लिश मीडियम शाळांकडून आवश्यक सुविधा न देता अवाजवी फीवाढ करण्यात येत असल्याचा आरोपही युवासेनेने केला आहे. वाढीव शुल्क भरण्यासाठी पालकांकडे सातत्याने तगादा लावला जात असल्याने अनेक कुटुंबांवर आर्थिक ताण निर्माण होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. युवासेनेने संबंधित अधिकाऱ्यांकडे दारूच्या नशेत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करणे, वस्तीगृहातील मूलभूत सुविधा तातडीने सुधारणा करणे, वॉचमन व निवासी अधिकाऱ्याची नियुक्ती करणे, तसेच इंग्लिश मीडियम शाळांची कथित बेकायदेशीर फीवाढ आणि पालकांकडून सुरू असलेला तगादा त्वरित थांबविण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. प्रशासनाने विद्यार्थी आणि पालकांच्या हिताचा विचार करून या प्रश्नांवर तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा आणि न्याय मिळवून द्यावा, अशी भूमिका युवासेनेचे जिल्हाध्यक्ष योगेश राजेंद्र मराठे यांनी व्यक्त केली.

जन सम्राट टाईम्स | ब्रेक न्यूज

# अक्कलपाडा धरणाच्या डाव्या-उजव्या कालव्यांना आवर्तन!

## शेतकऱ्यांना मोठा दिलासा

जन सम्राट टाईम्स



**धुळे । प्रतिनिधी** : मान्सूनचे आगमन लांबल्याने आणि वाढत्या उन्हामुळे धुळे तालुक्यातील शेतकरी तसेच पशुपालक चिंतेत असताना अक्कलपाडा धरणाच्या डाव्या व उजव्या कालव्यातून सिंचनासाठी पाण्याचे आवर्तन सुरू करण्यात आले आहे. आमदार राम भदाणे यांनी जिल्हाधिकारी आणि पाटबंधारे विभागाकडे सातत्याने पाठपुरावा केल्यानंतर हा निर्णय घेण्यात आल्याने परिसरातील बळीराजाला मोठा दिलासा मिळाला आहे. सध्या कापूस व मका पिकांच्या लागवडीला सुरुवात झाली असून पावसाअभावी पिकांवर पाण्याचा ताण निर्माण होण्याची शक्यता होती. याच पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांचे नुकसान टाळण्यासाठी योग्य वेळी कालव्यांमधून पाणी सोडण्याची मागणी आमदार राम भदाणे यांनी प्रशासनाकडे केली होती. त्यांच्या प्रयत्नांनंतर आज भारतीय जनता पक्षाच्या पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत कालव्यांना आवर्तन सोडण्यात आले. यावेळी भाजपाचे जिल्हा सरचिटणीस बाळासाहेब भदाणे, माजी कृषी सभापती अरविंद जाधव, जिल्हा उपाध्यक्ष देवेंद्र पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य शंकरराव खलाणे, जिल्हा उपाध्यक्ष अशोक सुडके, मंडळ अध्यक्ष छोटू मासुळे यांच्यासह पाटबंधारे विभागाच्या शाखा अभियंता मयुरी सूर्यवंशी, कालवा निरीक्षक सतीश अहिरे तसेच परिसरातील मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते. माजी कृषी सभापती अरविंद जाधव यांनी सांगितले की, आमदार राम भदाणे यांनी २ जून रोजी केलेल्या पत्रव्यवहाराच्या अनुषंगाने सहा रोटेशनच्या नियोजनानुसार आजपासून दोन्ही कालव्यांमध्ये दररोज ४० क्युसेस पाण्याचा विसर्ग समप्रमाणात करण्यात येत आहे.

### अक्कलपाडा धरणाच्या लाभ क्षेत्रातील गावे

डावा कालवा :
भदाणे, नवे भदाणे, खंडलाय (खुर्द व बुद्रुक), बांबुर्ले, शिरडाणे (प्र. नेर), गुलाबवाडी, कावठी, मेहेरगाव, नवलाणे, वार आदी गावांना लाभ.
उजवा कालवा :
भदाणे, नेर, अकलाड, मोराणे, लोहगड, लोणखेडी, चौगाव आणि कुसुंबा या गावशिवारांना सिंचनाचा लाभ मिळणार आहे.

# आरोग्यम् धनसंपदा'चा संदेश; नशिराबादमध्ये व्यायाम व सकस आहार प्रशिक्षण वर्गाला उत्स्फूर्त प्रतिसाद

## अक्षयदीप वेलनेस फिटनेस सेंटरचा उपक्रम; तज्ज्ञांनी व्यायाम आणि संतुलित आहाराचे महत्त्व पटवून दिले

जन सम्राट टाईम्स

**नशिराबाद । प्रतिनिधी** : वाढता लठ्ठपणा, बदलती जीवनशैली आणि त्यातून उद्भवणारे उच्च रक्तदाब, मधुमेह, थायरॉईड, पीसीओडी, पीसीओएस तसेच कर्करोगासारख्या गंभीर आजारांबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने अक्षयदीप वेलनेस फिटनेस सेंटरच्या वतीने नशिराबाद येथे विशेष व्यायाम व सकस संतुलित आहार मार्गदर्शन प्रशिक्षण वर्गाचे उत्साहात आयोजन करण्यात आले. 'पहिले सुख, निरोगी काया' हा संदेश देणाऱ्या या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. स्थानिक न्यू इंग्लिश स्कूलच्या प्रांगणात पार पडलेल्या या प्रशिक्षण वर्गात नशिराबाद, निमगाव, गोंभी आणि परिसरातील युवक-युवतींसह आरोग्यप्रेमींनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. उपस्थितांना नियमित व्यायाम, संतुलित आहार आणि आरोग्यदायी जीवनशैलीचे महत्त्व पटवून देण्यात आले. जागतिक आरोग्य सल्लागारांचे मार्गदर्शन या कार्यक्रमासाठी २० हजारांहून अधिक कुटुंबांना निरोगी जीवनशैलीचे प्रशिक्षण देण्याचा अनुभव असलेले वरिष्ठ जागतिक आरोग्य सल्लागार सौ. वनमाला सावकारे आणि रवींद्र सावकारे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. त्यांनी व्यायामशास्त्र आणि आहारशास्त्र यांचे महत्त्व सोप्या भाषेत स्पष्ट करत नियमित व्यायाम आणि योग्य आहार अनेक जीवनशैलीजन्य आजारांपासून बचावासाठी प्रभावी ठरू शकतो, असे सांगितले. नगरसेविका सुवर्णाताई महाजन यांचे कौतुक



कार्यक्रमाला उपस्थित असलेल्या नगरसेविका सौ. सुवर्णाताई सचिन महाजन यांनी आरोग्यविषयक जनजागृती करणाऱ्या या उपक्रमाचे कौतुक केले. अक्षयदीप वेलनेस फिटनेस सेंटरच्या माध्यमातून सुरू असलेल्या उपक्रमांमुळे समाजात आरोग्याविषयी सकारात्मक जागरूकता निर्माण होत असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच प्रत्येक नागरिकाने अशा उपक्रमांचा लाभ घेऊन निरोगी आणि आनंदी जीवनशैलीचा स्वीकार करावा, असे आवाहनही त्यांनी केले. मान्यवरांची उपस्थिती या प्रशिक्षण वर्गाला जागतिक आरोग्य सल्लागार सौ. लीना मॅडम, तुकाराम पाटील, व्यायाम प्रशिक्षक सौ. रेखा रोटे, वर्षा महाजन, सौ. दर्शना बोंडे, सौ. शोभा पाटील, ज्ञानदेव महाजन, सौ. योगिता खाचणे, सौ. संगीता मराठे, विलास पाटील, निवृत्ती पाटील, वैभव नाफडे आणि गोविंदा खाचणे यांच्यासह अनेक मान्यवर व प्रशिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन अक्षयदीप वेलनेस फिटनेस सेंटरच्या संचालिका सौ. कविता महावीर सैतवाल आणि रोशनी जयचंद्र सैतवाल यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले. कार्यक्रमाच्या समारोपावेळी आयोजकांनी उपस्थित सर्व आरोग्यप्रेमी, मान्यवर आणि सहकाऱ्यांचे आभार मानून भविष्यातही अशा जनजागृतीपर उपक्रमांचे आयोजन सुरू ठेवण्याचा संकल्प व्यक्त केला.

# प्लंबरकडूनच विश्वासघात; ज्या घरात काम केले तेथेच साथीदारांसह घरफोडी

जन सम्राट टाईम्स

**धुळे । प्रतिनिधी** : घराच्या नूतनीकरणाचे काम करताना मिळालेल्या माहितीचा गैरफायदा घेत प्लंबरनेच आपल्या साथीदारांसह घरफोडी केल्याची धक्कादायक घटना धुळ्यात उघडकीस आली आहे. या प्रकरणी स्थानिक गुन्हे शाखेने वेगाने तपास करत मुख्य आरोपीस ताब्यात घेतले असून त्याच्याकडून मिळालेल्या माहितीनुसार सुमारे १५ लाख रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ३१ मे २०२६ रोजी सायंकाळी फिर्यादी राम मोहनलाल हरवाणी (वय ३८, रा. अरुण कुमार वैद्यनगर, झुलेलाल सोसायटीजवळ, धुळे) यांच्या घराचे नूतनीकरणाचे काम पूर्ण करून संबंधित प्लंबर निघून गेला होता. त्यानंतर १ जून रोजी अज्ञात चोरट्यांनी घरात प्रवेश करून लाखो रुपयांचे सोने-चांदीचे दागिने व इतर मौल्यवान ऐवज लंपास केला. या प्रकरणी धुळे शहर पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक २३९/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता (BNS) कलम ३३१(३), ३३१(४) आणि ३०५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. गोपनीय माहितीच्या आधारे मुख्य आरोपी जेरबंद या गुन्ह्याचा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखेकडून सुरू असताना पोलीस निरीक्षक अभिजित सोनवणे यांना १० जून रोजी गोपनीय माहिती मिळाली.यानंतर पोलीस उपनिरीक्षक अमित माळी यांच्या नेतृत्वाखाली विशेष पथक तयार करण्यात आले. सापळा रचून पोलिसांनी आरोपी राजेश ऊर्फ भटू सहाणी (वय २८, व्यवसाय – प्लंबिंग, रा. धुळे) याला ताब्यात घेतले. साथीदारांसह घरफोडीची कबुली सखोल चौकशीत आरोपीने आपल्या साथीदारांच्या मदतीने अरुण कुमार वैद्यनगर येथील घरात रात्रीच्या वेळी प्रवेश करून चोरी केल्याची कबुली दिली. या गुन्ह्यात त्याच्यासोबत शैलेश राजू राखुंडे, विवेक ऊर्फ दादू गजानन भावड आणि अमोल ऊर्फ सोनू ऊर्फ ढोक्या रामकृष्ण धीनभादूर यांचा सहभाग असल्याचे त्याने पोलिसांना सांगितले. आरोपीने चोरीतील काही दागिने स्वतःकडे तर उर्वरित साथीदारांकडे असल्याची माहिती दिली. त्यानंतर पोलिसांनी आरोपीच्या अंगझडतीत आणि पुढील कारवाईत चोरीतील सुमारे १५ लाख रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला.

# वीजबिलांवरून शिरपूर फर्स्टचा महावितरण कार्यालयावर ठिय्या

## अपुऱ्या वीजपुरवठ्याविरोधात संताप

जन सम्राट टाईम्स



**शिरपूर | प्रतिनिधी** : अवाजवी वीजबिले, अपुरा वीजपुरवठा आणि महावितरणच्या कथित गलथान कारभाराविरोधात शिरपूर फर्स्टच्या वतीने आज शिरपूर येथील महावितरण (एमएसईबी) कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन करण्यात आले. शहरातील नागरिक, व्यापारी आणि तालुक्यातील शेतकरी मोठ्या संख्येने या आंदोलनात सहभागी झाल्याने परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले.

गेल्या काही दिवसांपासून शिरपूर शहरासह ग्रामीण भागातील नागरिकांना प्रत्यक्ष वापराच्या तुलनेत अवाजवी वीजबिले येत असल्याच्या तक्रारी सातत्याने वाढत आहेत. अनेक ग्राहकांना अत्यल्प वापर असूनही हजारो रुपयांची बिले आकारण्यात आल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला. यामुळे सर्वसामान्य ग्राहक आर्थिक अडचणीत सापडत असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली. दुसरीकडे, शेतकऱ्यांना शेतीपंपांसाठी नियमानुसार किमान आठ तास वीजपुरवठा मिळणे अपेक्षित असताना प्रत्यक्षात त्यापेक्षा कमी वेळ वीज उपलब्ध होत असल्याचा आरोप करण्यात आला. अपुऱ्या वीजपुरवठ्यामुळे सिंचनावर परिणाम होत असून शेतीची कामे खोळंबत असल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी वाढली आहे. या सर्व प्रश्नांकडे महावितरण प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी शिरपूर फर्स्टच्या वतीने ठिय्या आंदोलन करण्यात आले. आंदोलनादरम्यान महावितरण कार्यालयात नागरिकांच्या वीजबिल आणि वीजपुरवठ्याशी संबंधित तक्रारींचे त्वरित निवारण करण्यासाठी स्वतंत्र 'हेल्प डेस्क' सुरू करण्याची मागणी करण्यात आली. आंदोलनाचे विशेष आकर्षण म्हणजे नागरिकांना आलेल्या वीजबिलांचे तोरण तयार करून ते महावितरण कार्यालयाच्या प्रवेशद्वारावर लावण्यात आले. या अनोख्या पद्धतीने आंदोलनकर्त्यांनी प्रशासनाच्या कार्यपद्धतीचा निषेध नोंदवत ग्राहकांच्या समस्यांकडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. यावेळी शहरातील नागरिक, व्यापारी, सामाजिक कार्यकर्ते तसेच तालुक्यातील विविध भागांतील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. अवाजवी वीजबिलांचा प्रश्न आणि अपुऱ्या वीजपुरवठ्याची समस्या तातडीने सोडवावी, अन्यथा आगामी काळात आणखी तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा शिरपूर फर्स्टच्या पदाधिकाऱ्यांनी महावितरण प्रशासनाला दिला आहे. या आंदोलनामुळे शिरपूर तालुक्यातील वीजपुरवठा आणि बिलिंग व्यवस्थेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून, महावितरण प्रशासन यावर काय भूमिका घेते याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

जन सम्राट टाईम्स | अँकर न्यूज

# रोटवद ग्रामपंचायत निवडणुकीसाठी आरक्षण सोडत जाहीर

## सरपंच पदांच्या आरक्षणाची प्रक्रिया पारदर्शकपणे पार; निवडणुकीच्या हालचालींना वेग

जन सम्राट टाईम्स



**रोटवद । प्रतिनिधी:** आगामी ग्रामपंचायत निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर धरणगाव तालुक्यातील रोटवद ग्रामपंचायतीच्या सदस्य व सरपंच पदांच्या आरक्षणाची सोडत गुरुवार, ११ जून २०२६ रोजी रोटवद येथे पार पडली. संबंधित महसूल व ग्रामपंचायत प्रशासनाच्या उपस्थितीत पारदर्शक पद्धतीने ही प्रक्रिया पूर्ण करण्यात आली.

यावेळी मंडळ अधिकारी राकेश काळमेहाख, गैरव बाविस्कर, ग्रामविस्तार अधिकारी अनिल मोरतोडे, रोटवदचे सरपंच सुदर्शन पाटील, उपसरपंच विशाल पाटील, पोलीस पाटील नरेंद्र शिंदे, माजी उपसरपंच पाचोरेकर आबा, भरत मराठे, मिलिंद शिंदे, दिनू आप्पा गोंदेगाव, महारू पाटील, जनसम्राट टाइम्सचे प्रतिनिधी प्रशांत शिंदे, गटप्रवर्तक आशाबाई मराठे, आशा सेविका वंदना पाटील, राजेश पाटील, ज्ञानेश्वर पाटील, अंबादास शिंदे तसेच ग्रामस्थ, युवा नेतृत्व आणि इच्छुक उमेदवार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अशी झाली आरक्षण सोडत सोडतीनुसार वार्ड क्रमांक १ मध्ये एक जागा ओबीसी महिला, एक जागा सर्वसाधारण महिला आणि एक जागा सर्वसाधारण (महिला किंवा पुरुष) अशी आरक्षित करण्यात आली आहे. वार्ड क्रमांक २ मध्ये एक जागा ओबीसी (महिला किंवा पुरुष), एक जागा सर्वसाधारण महिला आणि एक जागा सर्वसाधारण (महिला किंवा पुरुष) अशी आरक्षणाची रचना निश्चित करण्यात आली.

तर वार्ड क्रमांक ३ मध्ये एक जागा अनुसूचित जाती (एससी) महिला, एक जागा अनुसूचित जमाती (एसटी) महिला आणि एक जागा सर्वसाधारण (महिला किंवा पुरुष) यासाठी आरक्षित करण्यात आली आहे. निवडणुकीच्या हालचालींना वेग आरक्षण जाहीर होताच संभाव्य उमेदवारांमध्ये उत्सुकता वाढली असून गावात निवडणुकीच्या राजकीय घडामोडींना वेग आला आहे. विविध इच्छुकांनी तयारीला सुरुवात केली असून स्थानिक पातळीवर राजकीय समीकरणेही बदलू लागल्याची चर्चा आहे. दरम्यान, प्रशासनाने आरक्षणासंदर्भातील अधिकृत यादी प्रसिद्ध केली असून संबंधितांनी ती पाहून आवश्यक ती माहिती घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### इच्छुक उमेदवार मोठ्या संख्येने उपस्थित

११ जून २०२६ रोजी रोटवद येथे पार पडली. संबंधित महसूल व ग्रामपंचायत प्रशासनाच्या उपस्थितीत पारदर्शक पद्धतीने ही प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. यावेळी मंडळ अधिकारी राकेश काळमेहाख, गैरव बाविस्कर, ग्रामविस्तार अधिकारी अनिल मोरतोडे, रोटवदचे सरपंच सुदर्शन पाटील, उपसरपंच विशाल पाटील, पोलीस पाटील नरेंद्र शिंदे, माजी उपसरपंच पाचोरेकर आबा, भरत मराठे, मिलिंद शिंदे, दिनू आप्पा गोंदेगाव, महारू पाटील, जनसम्राट टाइम्सचे प्रतिनिधी प्रशांत शिंदे, गटप्रवर्तक आशाबाई मराठे, आशा सेविका वंदना पाटील, राजेश पाटील, ज्ञानेश्वर पाटील, अंबादास शिंदे तसेच ग्रामस्थ, युवा नेतृत्व आणि इच्छुक उमेदवार मोठ्या संख्येने उपस्थित होते.